प्रेस नोट ०३ दिनांक ३१/०१/२०२४

‘‘ पोलीस पाल्य चि. प्रथमेश मारूती पाटील यांचे क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीबाबत...’’

आर सी एफ पोलीस ठाणेस नेमणुकीस असलेले पोलीस शिपाई श्री मारूती पाटील यांचा मुलाग चि. प्रथमेश मारूती पाटील, वय १८वर्षे याचे सन २०२३ मध्ये मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून १९ वर्षाखालील मुंबई क्रिकेट संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये बीकेसी मुंबई येथे पार पडलेल्या ‘‘ कुच बिहारी ट्रॉफी स्पर्धेचे वेळी प्रथमेश याने फलंदाजी करताना तामिळनाडू संघाविरूध्द १२३ धावा, बँगलोर संघाविरूध्द नाबाद ११६ धावा व कर्नाटक संघाविरूध्द नाबाद १०१ धावा करून भरीव कामगिरी केली आहे.

त्याचे या कामगिरीबद्‌दल आज रोजी आर सी एफ पोलीस ठाणेच्या प्रांगणात पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, श्री हेमराजसिंह राजपूत यांनी प्रथमेश याचा सत्कार करून त्यास यापुढील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. तसेच यामध्ये त्यास मोलीची साथ देणारे त्याचे वडिल श्री मारूती पाटील यांचाही सत्कार पोलीस उप आयुक्त यांनी केला.

सदर कार्यक्रमास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, श्री हेमराजसिंह राजपूत, आर सी एफ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री केदारी पवार व पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी हजर होते.

--------